झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व
पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तांत्रिक ३/१८४६/२०२२
दिनांक : ०८ /१२/२०२२

१०३८
०८/१२/२०२२

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-प्रारूप योजना

(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४ (३) अन्वये)

प्रस्तावना :

१. मौजे पिंपरी येथील स.नं. १०३ पै., सि.स.नं. ६४२६ पै.ते ६४२९ पै. ६४६२, ६२६२/१, आंबेडकर नगर, नेहरू नगर झोपडपट्टी संदर्भात २२३७.१० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.ओम.साई कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.१५/०२/२०१३ रोजी प्रस्ताव दाखल करणेत आला आहे. दि.२३/०४/२०१८ रोजीचे सक्षम प्राधिकारी यांनी पात्रतेसंदर्भात तयार केलेल्या परिशिष्ट-२ नुसार सदर झोपडपट्टीतील ९२.७० टक्के झोपडीधारकांची विकसकाला संमती असल्याचे दिसून येते.

२. सदर क्षेत्रावर झोपडपट्टी असल्याचे खालील अहवालांनुसार स्पष्ट होत आहे.

अ) सदर क्षेत्र तत्कालिन सक्षम प्राधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, पुणे यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र दि.११/०४/१९९१ पृष्ठ क्र.८५७ वर प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ४(१) मधील तरतुदीनुसार "झोपडपट्टी क्षेत्र" म्हणून घोषित केले आहे.

ब) सदरच्या क्षेत्रामध्ये झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती/गलिच्छ वस्ती अस्तित्वात असल्याबाबत संबंधित सक्षम प्राधिकारी तथा सहा-आयुक्त झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी यांचा अहवाल जा.क्र.झोनिपू/०५/कावि/३८/२०१७ दि.०२/०५/२०१७ प्राधिकरणास दि.०३/०५/२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे.

३. उक्त अधिनियमातील कलम ३क च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी सदरचे क्षेत्र हे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून दि.२४/११/२०१७ रोजी घोषित करण्यात आले असून सदर आदेशास खालीलप्रमाणे प्रसिद्धी दिली आहे.

अ) महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि.३०/११/२०१७ ते दि.०६/१२/२०१७ चे अधिसुचनेद्वारे पृष्ठ क्र. ३ वर प्रसिद्धी देण्यात आली आहे.

ब) सदर आदेशास दि.२७/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये जनता संपर्क अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्याकरिता पत्र देणेत आले.

क) उपरोक्त आदेश सदर झोपडपट्टी क्षेत्रामधील दर्शनीय ठिकाणी डकविण्यात येऊन त्याबाबतचा पंचनामा दि.११/१२/२०१७ रोजी करण्यात आला आहे.

४. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रारूप उक्त नियमावलीतील नियम क्र. एस आर ४(३) अन्वये खालीलप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

❖ झोपडपट्टी पुनर्वसन प्रारूप योजना:

<u>झोपडपट्टीचे नाव</u> : आंबेडकर नगर (नेहरू नगर) झोपडपट्टी
<u>महानगरपालिका क्षेत्र</u> : पिंपरी चिंचवड महानगरपालिका
<u>योजना क्षेत्र</u> : २२३७.१० चौ.मी.

| अ.क्र. | स.नं./सि.स.नं./ फा.प्लॉट नं. | क्षेत्र (हेक्टर – आर) | अधिकार अभिलेखातील भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सि.स.नं.६४२६ पै | ४१७.६० चौ.मी. | मे.ओम.साई कन्स्ट्रक्शन |
| २ | सि.स.नं.६४२७ | ४७९.४० चौ.मी. | मे.ओम.साई कन्स्ट्रक्शन |
| ३ | सि.स.नं.६४२८ | ४८८.७० चौ.मी. | मे.ओम.साई कन्स्ट्रक्शन |
| ४ | सि.स.नं.६४२९ पै | १५०.०० चौ.मी. | मे.ओम.साई कन्स्ट्रक्शन |
| ५ | सि.स.नं.६४६२ | ७०१.४० चौ.मी. | मे.ओम.साई कन्स्ट्रक्शन |
| | एकूण | २२३७.१० चौ.मी. | मे.ओम.साई कन्स्ट्रक्शन |

| | | |
|---|---|---|
| १ | योजना क्षेत्र चतु:सीमा :-<br>अ) दि. २४/११/२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम ३ क च्या अधिसुचनेप्रमाणे पुढीलप्रमाणे चतु:सीमा प्रसिद्ध करण्यात आली होती. | पूर्वेस – सि.स.नं ६४२५<br>पश्चिमेस – सि.स.नं ६४२९,६४३०<br>उत्तरेस – सि.स.नं ६४०३<br>दक्षिणेस – सि.स.नं ६४६२ |
| | ब) कलम ३ ड नुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आला आहे. | पूर्वेस – सि.स.नं ६४२५<br>पश्चिमेस –लागू सि.स.नं ६४३०<br>उत्तरेस – लागून रस्ता<br>दक्षिणेस – सि.स.नं ६४६३ |
| | क) उपरोक्त ३ क व ३ ड च्या तफावतीमुळे अधिसूचनेसंदर्भात शुद्धीपत्रक प्रसिद्ध करून अंतिम करावयाची चतु:सीमा | पूर्वेस – सि.स.नं ६४२६, ६४७९, ६४७८<br>पश्चिमेस –सि.स.नं.६४२९ पै., ६४३०<br>उत्तरेस – लागून रस्ता<br>दक्षिणेस – सि.स.नं.६४३३, ६४६१/१,६४५९/१,६४६३ |